# प्रेस नोट

## पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई अधिनस्त पोलीस ठाण्यांमधील सराईत गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई – १३ सराईत गुन्हेगारांना ०२ वर्षासाठी हद्दपार

मुंबई शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण करणे तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई करणे, हा मुंबई पोलीसांचा सर्वोच्च प्राधान्याचा विषय असून त्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त, मुंबई, मा. पोलीस सह आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), मुंबई तसेच मा. अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने कठोर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

त्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई यांच्या अधिनस्त पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गुन्हेगारी पूर्वइतिहास असलेल्या सराईत गुन्हेगारांचा सखोल आढावा घेण्यात आला. त्यामध्ये परिसरात सातत्याने दहशतीचे वातावरण निर्माण करणारे, घातक शस्त्रांचा धाक दाखवून नागरिकांना व व्यावसायिकांना धमकावणारे, मारहाण, शिवीगाळ, हप्तेवसुली, खंडणी, जबरी चोरी, घातक शस्त्रांच्या धाकाने पैसे उकळणे, अंमली पदार्थ विक्री करणारे तसेच सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा पोहोचविणारे आणि गंभीर स्वरूपाचे दखलपात्र गुन्हे वारंवार करणारे एकूण १३ सराईत गुन्हेगार आढळून आले.

सदर गुन्हेगारांच्या सातत्यपूर्ण गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी व व्यावसायिक यांच्यामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक नागरिक हे त्यांच्या दहशतीमुळे तक्रार देण्यासही धजावत नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे अशा प्रवृत्तीच्या गुन्हेगारांविरुद्ध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक होते.

त्या अनुषंगाने संबंधित पोलीस ठाण्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदीनुसार हद्दपारीचे प्रस्ताव सादर केले. त्यानुसार सुनावणीची संपूर्ण कायदेशीर सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर संबंधित १३ सराईत गुन्हेगारांना मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्याच्या हद्दीतून ०२ (दोन) वर्षाच्या कालावधीसाठी हद्दपार (Externment) करण्यात आले आहे.

**हद्दपार करण्यात आलेल्या सराईत गुन्हेगारांची माहिती :-**

### कलम ५६(१)(अ)(ब)(बब) महाराष्ट्र पोलीस कायदा
### (अंमली पदार्थ विक्रीसह इतर शरीराविरूध्द गुन्हयातील आरोपी)

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | फोटो |
|---|---|---|---|
| १ | वनराई | **नईम शहाबुददीन धोबी, वय ३० वर्षे,**<br>रा.ठि. युनिट नं. १३, आरे मिल्क कॉलनी, भवानी नगर, कार्तिक मंदिर जवळ, गोरेगाव (पुर्व) मुंबई. |  |
| २ | कुरार | **सुभाष मोतीलाल पटेल, वय ४१ वर्षे,**<br>रा.ठि. सावित्रीबाई फुले नगर, स्वामी विवेकानंद शाळेच्या पाठीमागे, साई मंदिराच्या जवळ, कुरार गाव, मालाड(पुर्व), मुंबई. |  |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **समतानगर** | **योगेश बाबुराव वाघमारे, वय ३० वर्षे,**<br>रा.ठि. जय जयगदंबा चाळ, दत्त मंदिर जवळ, हनुमान नगर, कांदिवली (पुर्व), मुंबई |  |
| ४ | **दहिसर** | **सुरेश विजय माला उर्फ नेपल्या, वय ३५ वर्षे,**<br>रा.ठि. रुम नं. ४, नाडा चाळ, भारती व्यायाम शाळेजवळ, केतकीपाडा, दहिसर (पूर्व), मुंबई |  |

## कलम ५६(१)(अ)(ब) महाराष्ट्र पोलीस कायदा

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | फोटो |
|---|---|---|---|
| १ | **वनराई** | **अजय दिनेश द्विवेदी, वय ३४ वर्षे,**<br>रा.ठि. शांताबाबु राठोड चाळ, रुम नं. २४, विजय नगर, आरे नगर रोड, गोरेगाव (पुर्व), मुंबई |  |
| २ | **दिंडोशी** | **धीरज विजय गोरगावकर, वय ३४ वर्षे,**<br>रा.ठि. तीन डोंगरी, यशवंत नगर, सुंदरनगर गल्ली, हनुमान नगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई |  |
| ३ | **समतानगर** | **जतीन बबन जावळे उर्फ जेत्या, वय २५ वर्षे,**<br>रा.ठि. नारायण माळी चाळ, रुम नं. १२१, नरसीपाडा, आकुर्ली रोड, कांदिवली (पुर्व), मुंबई. |  |
| ४ | **समतानगर** | **जयप्रकाश पुदियापुरावेल उर्फ बाबू, वय २९ वर्षे,**<br>रा.ठि. पतीराम चाळ, रुम क्र. ५५७, नित्यानंद हॉटेलच्या पाठीमागे, नरसीपाडा, कांदिवली (पुर्व), मुंबई |  |
| ५ | **समतानगर** | **दिपांशू जयशंकर सिंग, वय २७ वर्षे,**<br>रा.ठि. रुम नं. ८, राहुल निवास चाळ, सिंग इस्टेट रोड नं. ३, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पुर्व), मुंबई |  |
| ६ | **दहिसर** | **आशिष विनोद यादव, वय २९ वर्षे,**<br>धंदा चालक, रा.ठि. जयराम मुकादम चाळ, अवध विदयालयाजवळ, वैशाली नगर, दहिसर (पुर्व), मुंबई |  |
| ७ | **दहिसर** | **कुशल सुभाष दुबे, वय २० वर्षे,**<br>रा.ठि. रुम नं. २, फौजदार मराठी चाळ, यशवंतराव तावडे रोड, दहिसर(पुर्व), मुंबई |  |

## कलम-५७ महाराष्ट्र पोलीस कायदा

| अ.क्र. | पोलीस ठाणे | हद्दपार इसमाचे नाव व पत्ता | फोटो |
|---|---|---|---|
| १ | दहिसर | **आयुब सरवरअली अन्सारी वय २६ वर्षे,** रा.ठि. रुम नं. २, मस्जिद गल्ली, संघर्ष वाहिनी ऑफीस समोर, शांतीनगर डोगरी, दहिसर (पुर्व), मुंबई. |  |
| २ | दहिसर | **महेश अमरसिंग चौहान उर्फ भांज्या, वय ३५ वर्षे,** रा.ठि. अख्तरअली चाळ, रुम नं. २, अजिंक्य नगर, रावळपाडा, दहिसर(पुर्व), मुंबई. |  |

मुंबई पोलीसांकडून करण्यात आलेली ही कारवाई गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर प्रभावी प्रतिबंध निर्माण करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून, संघटित गुन्हेगारी, दादागिरी, हप्तेवसुली, खंडणी, शस्त्रांच्या धाकाने नागरिकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर आळा बसण्यास मोठी मदत होणार आहे. अशा प्रतिबंधात्मक कारवायांमुळे कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होणार असून, नागरिकांना सुरक्षित, शांततापूर्ण व निर्भय वातावरण उपलब्ध करून देण्याच्या मुंबई पोलीसांच्या प्रयत्नांना अधिक बळ मिळणार आहे.

पोलीस उप आयुक्त, उत्तर परिमंडळ-३, मुंबई यांच्या अधिनस्त सर्व पोलीस ठाण्यांना हद्दपार आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात आली असून वर नमूद इसमांना हद्दपार आदेश तामील करण्यात आलेले आहेत. हद्दपार करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती आदेशाचे उल्लंघन करून मुंबई शहर अथवा मुंबई उपनगर जिल्ह्याच्या हद्दीत प्रवेश करताना अथवा वास्तव्यास असल्याचे आढळून आल्यास तिच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील संबंधित तरतुदीनुसार तात्काळ व कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मुंबई पोलीस नागरिकांना आवाहन करीत आहेत की, आपल्या परिसरात कोणताही हद्दपार गुन्हेगार अथवा संशयित व्यक्ती वावरत असल्याची माहिती मिळाल्यास ती तात्काळ संबंधित पोलीस ठाण्यास किंवा मुंबई पोलीस आपत्कालीन क्रमांक १०० / ११२ वर कळवावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.

'सुरक्षित मुंबई, निर्भय नागरिक' हे ध्येय साध्य करण्यासाठी मुंबई पोलीस अशा प्रकारच्या प्रतिबंधात्मक व कायदेशीर कारवाया भविष्यातही अधिक प्रभावीपणे व सातत्याने राबवत राहतील.

..................